| MHRG030015102024 | दाखल दिनांक : | २९/०६/२०२४ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक : | ०४/०७/२०२४ | | |
| | निकाल दिनांक : | ०७/०४/२०२६ | | |
| | कालावधी : | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०१ | ०९ | ०९ |

| | |
|---|---|
| | **मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांचे न्यायालयात**<br>**(पिठासिन अधिकारी : एम्. बी. अत्तार )**<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ९४/२०२४**<br>**निशाणी क्र. १९/ब** |
| | अलिबाग पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. १४१/२०२४ |
| अभियोग पक्ष | अलिबाग पोलीस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे | सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील |
| | १. **किरण दिपक पवार**<br>वय : ४८ वर्षे, व्यवसाय : साऊंड सिस्टीम |
| | २. **निलीमा किरण पवार**<br>वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहीणी<br>दोघेही राहणार : कृष्ण दर्शन को. ऑप. हाऊ. सोसायटी, ए विंग, खोली क्र. २०१, पिंपळभाट, ता. अलिबाग, जि. रायगड |
| आरोपींतर्फे वकील | आरोपींतर्फे वकील श्री. अंकित बंगेरा, श्री. क्रांतीदिप डवले |

**नियमित फौजदारी खटला क्र. १४/२०२४**
(सरकार वि. किरण पवार वगैरे ०१)
**निशाणी क्र. १९/ब**

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख / कालावधी : | ०५/०६/२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख : | ०७/०६/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख : | २९/०६/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख : | ०४/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख : | ०७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख : | ०७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख : | ०७/०४/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख : | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याची तारीख | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कशा खाली नोंदविण्यात आला | निर्दोष सोडण्यात आले किंवा शिक्षा देण्यात आली | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **किरण दिपक पवार** | -- | -- | भा.दं.वि.कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये | आरोपींना निर्दोष सोडण्यात आले. | -- | -- |
| २. | **निलीमा किरण पवार** | -- | -- | | | -- | -- |

## भाग – क

## साक्षीदारांची यादी

### अ – अभियोग पक्ष

| अनु.क्र | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| १. | सा.क्र. १ | संपदा संदीप नागावकर | १४ | फिर्यादी |
| २. | सा.क्र. २ | संदीप वसंत नागावकर | १६ | साक्षीदार |

### ब – बचाव पक्षातर्फे साक्षीदार असल्यास

| अनु.क्र | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| -- | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

### क – न्यायालयातर्फे साक्षीदार असल्यास

| अनु.क्र. | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| -- | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## सरकारतर्फे/ आरोपीतर्फे / न्यायालयामार्फत दिल्या गेलेल्या निशाण्यांची यादी

### अ– अभियोग पक्षातर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १. | फिर्याद | पी–१/निशाणी क्र. १५ |

**ब– बचाव पक्षातर्फे / आरोपींतर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र**

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क– न्यायालयामार्फत निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र.**

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड– भौतिक वस्तू**

| अ.क्र. | क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (दि. ०७/०४/२०२६ रोजी घोषित)

**०१.** आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :

**०२.** दि. ०५/०६/२०२४ रोजी सायंकाळी सुमारे ०६:३० ते ०७:०० वाजण्याच्या दरम्यान, कृष्णदर्शन को–ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या पार्किंगमध्ये फिर्यादी संपदा संदीप नागावकर हिचे पती व त्याच सोसायटीच्या 'ए' विंगमध्ये राहणारे किरण

दिपक पवार आणि त्यांची पत्नी निलीमा किरण पवार यांच्यात गाडी पार्किंगच्या कारणावरून वाद सुरू होता. त्यावेळी किरण पवार व निलीमा पवार हे दोघेही फिर्यादीच्या पतीवर मारहाण करण्यासाठी धावून गेले. त्यावेळी फिर्यादी मध्ये पडली असता, किरण पवार व निलीमा पवार यांनी तिला शिवीगाळ करून हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच तिचा उजवा हात पिळून दुखापत केली. म्हणून फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केली आहे.

**०३**. सदर फिर्यादवरुन गुन्हा क्र. १४१/२०२४ नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलीस हवालदार ए. ए. जोशी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, घटनास्थळाचे फोटो काढले, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

**०४**. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यासाठी दोषारोप (निशाणी क्र. ७) निश्चित केला. त्यातील मजकूर त्यांनी आरोपींना वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपींनी जबाब (निशाणी क्र. ८ व ९) देवून गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब (निशाणी क्र. १७ व १८) नोंदविण्यात आला. आरोपींचा बचाव नकारात्मक स्वरुपाचा आहे.

**०५**. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** न्यायालयाचे विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. ०५/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०६.३० ते ०७.०० वाजताच्या सुमारास कृष्ण दर्शन को. ऑप. हाऊ. सोसायटी, पिंपळभाट, ता. अलिबाग, जि. रायगड येथील पार्कींगमध्ये आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता फिर्यादी संपदा संदिप नागावकर हिला मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर स्वरुपाची दुखापत पोहोचविली व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम **३२५** सह कलम **३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| २. | तसेच, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता फिर्यादीला हाताबुक्यांनी मारहाण करुन तिला इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम **३२३** सह कलम **३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| ३. | तसेच वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला अपमानास्पद भाषेत शिवीगाळ करुन ती सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त होईल असे कृत्य केले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम **५०४** सह कलम **३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |

४. आदेश कोणता? आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

:: **<u>का र ण मी मां सा</u>** ::

**<u>प्रश्न क्र. १ ते ३ बाबत</u>** :

(वरील प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील निष्कर्ष मी एकत्रात देत आहे.)

**०७**. फिर्यादी संपदा संदीप नागावकर (अ.सा.१) हिने तिच्या पुराव्यात सांगितले आहे की, दि. ०५/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०६:३० ते ०७:०० वाजताच्या दरम्यान पिंपळभाट येथील तिच्या राहत्या घराच्या पार्किंगमध्ये घटना घडली होती. तेथे तिचे पती व आरोपी यांचा पार्किंगवरुन वाद चालू होता. ती तिथे गेली. तिथे गेल्यावर आरोपी व तिच्या पतीमध्ये बाचाबाची चालू होती. ती मध्ये गेली असता तिला कोणाचा तरी धक्का लागला व ती पडली. आरोपी व तिचे पती यांच्यामध्ये वाद चालू होता. घटनेनंतर ती पोलीस ठाण्यात गेली. त्यानंतर सिव्हील हॉस्पीटलमध्ये गेली. तिने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार (पी–१/निशाणी क्र. १५) दिली.

**०८**. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादीचे पती संदीप वसंत नागावकर (अ.सा.२) यांची साक्ष नोंदविलेली आहे. परंतु सदर साक्षीदार अभियोग पक्षास पाठींबा देत नाही. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला परंतु सदर उलटतपासात अभियोगपक्षास उपयोगी पडेल असे कोणतेही विधान मला आढळून आले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास उपयोगी नाही.

**०९**. फिर्यादी व साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होते की, दोघांनी आरोपींविरुद्ध मारहाण व शिवीगाळीसंदर्भात कोणतेही कथन केलेले नाही. तसेच फिर्यादीला कोणी मारहाण केली हे तिने तिच्या साक्षीत सांगितलेले नाही.

जरी फिर्यादीला निशाणी क्रमांक देण्यात आलेला असता तरीही त्यामधील मजकूर फिर्यादीने सांगितलेला नाही. त्यामुळे फिर्याद सिद्ध झालेली नाही. त्यामुळे आरोपींविरुद्ध कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

**१०.** अभियोग पक्षाचा आरोप होता की, आरोपींनी संगनमताने फिर्यादीला मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर स्वरुपाची दुखापत पोहोचविली, हाताबुक्यांनी मारहाण करुन तिला इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली तसेच तिला अपमानास्पद भाषेत शिवीगाळ करुन ती सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त होईल असे कृत्य केले. तथापि, या सर्व आरोपांना पुष्टी देणारा कोणताही पुरावा न्यायालयात सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर खटल्यामधील मुद्द्यांबाबत (प्रश्न क्र. १ ते ३) उत्तर नकारार्थी असून, अभियोग पक्षाने आरोपींच्या विरोधात गुन्हा सिद्ध करण्यास पुरेशी साक्ष पुरवलेली नाही. परिणामी, आरोपींविरुद्ध आरोप सिद्ध होऊ शकलेले नाहीत.

**प्रश्न क्र. ४ बाबत** :

**११.** आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला हे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. त्यामुळे प्रश्न क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

:: **आ दे श** ::

१. आरोपींना भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. त्यांना सोडून देण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- (रुपये पंधरा हजार मात्र) चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रक्कमेचा जामीन द्यावा.

ATTAR MOUSAMA BADSHAH
Digitally signed by ATTAR MOUSAMA BADSHAH
Date: 2026.04.07 16:53:17 +0530

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०७/०४/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड-अलिबाग.